# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ०३.०६.२०२६

तहसिल कार्यालय, धुळे येथील पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष महेश बागुल यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | धुळे शहर पो. स्टे. गुरनं. २४१/२०२६, जि. धुळे |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. ०३.०६.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | मनिष महेश बागुल वय ३० वर्षे, गोदाम व्यवस्थापक तथा पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय, धुळे. रा.साईछत्र अपार्टमेंट, फ्लॅट नं. १९, आर.टी.ओ कार्यालयाजवळ, पेठ रोड, नाशिक. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—**

तक्रारदार हे मौजे अंचाडे, ता.जि.धुळे येथील रहिवासी असुन त्यांनी व त्यांची पत्नी यांनी त्यांच्या शेतजमीनीत पिकविलेली ज्वारी महाराष्ट्र शासनाच्या किमान आधारभुत भरड धान्य खरेदी हंगाम रब्बी सन २०२५—२६ अंतर्गत शासनामार्फत खरेदी करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करुन सदर ज्वारीचा माल आज दि.०३.०६.२०२६ रोजी शासनाकडुन खरेदी होण्याकरीता धुळे शासकीय गोदाम येथे घेवुन गेल्यावर सदर ज्वारीच्या मालाची मोजणी करुन तक्रारदार यांना मोजमापाच्या पावत्या दिल्या होत्या. तेव्हा तेथे हजर असलेले पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी तक्रारदार यांना बाजुला घेवुन जावुन त्यांच्या ज्वारीचा दर्जा चांगला दाखवुन मोजणी करुन घेण्यास सांगितले त्याचे त्यांना ५,०००/— रुपये दयावे लागतील अन्यथा ऑनलाईन बिल टाकण्यास सांगणार नाही.असे सांगुन लाच मागणी केल्याची तक्रारदार यांनी आज दि.०३.०६.२०२६ रोजी ला.प्र.वि, धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी तक्रारदार यांची ज्वारी चांगल्या दर्जाची दाखवुन मोजुन घेण्यास सांगितल्याच्या मोबदल्यात पंचासमक्ष ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान पुरवठा निरीक्षक तथा गोदाम व्यवस्थापक मनिष बागुल यांनी तक्रारदार याच्याकडुन ५,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

| | |
|---|---|
| पर्यवेक्षण अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे. |
| सापळा अधिकारी | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे |
| सापळा पथक | पदमावती कलाल पोलीस निरीक्षक, पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, प्रशांत बागुल, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैदाणे, सागर माळी, पोहेकॉ. सुधीर मोरे |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/निम शासकिय अधिकारी/ कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**


संपर्क पत्ता — लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in
ईमेल — dyspacbdhule@gmail.com
टोलफ्री क्रमांक — १०६४
दुरध्वनी क्रमांक — ०२५६२—२३४०२०
व्हॉटस अॅप क्रमांक — ७७९८१६१०६४